# कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर

**श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर ४१६ ००५.**

---

## कोल्हापूरी गुळास G.I. मंजूर झालेने बाजार समितीचे वतीने गूळ उत्पादक शेतकरी, गु–हाळघरमालक, गुळवे, व्यापारी यांचेसाठी दिनांक–११–१२–२०१३ इ.रोजी व्यापक कार्यशाळेचे आयोजन.

---

कोल्हापूर जिल्हयात ऊसाचे पिक जास्त असलेने, ऊसापासून तयार केल्या जाणा–या गुळास कोल्हापूर येथेच बाजारपेठ स्थापन करावी, आपली प्रजा सुखी समृध्द व्हावी या उदा–त हेतूने राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांनी सन १८९५ मध्ये कोल्हापूर येथे गूळ बाजारपेठेची स्थापना केली. तेंव्हापासून कोल्हापूरची गूळ बाजारपेठ देशातील अग्रेसर गूळ बाजारपेठ आहे. भारतात गूळाला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. लोह, खनिज, कॅल्शियम आदी घटकामूळे आयुर्वेदातही गूळाला महत्व आहे. कोल्हापूरी गूळाची चव, रंग, रूची व कठीणपणा इ. गुण वैशिष्ठयामूळे कोल्हापूरी गूळास महाराष्ट्राबरोबरच प्रामुख्याने गुजरात, राजस्थान इ. राज्यात प्रचंड मागणी असून, तो भारतातील इतर राज्यातही लोकप्रिय आहे. त्याचबरोबर देशाबाहेर देखील त्याची मोठया प्रमाणावर निर्यात होवू लागलेली आहे. कोल्हापूरचा गुळ जगप्रसिध्द आहे.

कोल्हापूर जिल्हयात निरनिराळया ऊसाच्या जातीपासून उत्तम प्रतीचा गूळ तयार करतात. कोल्हापूरी गूळाला अधिक गोडी व सोनेरी पिवळा रंग असतो. गुळाचा वापर लोकांच्या आहारात तसेच जनावरांचे खाद्यात केला जातो. तसेच आयुर्वेद औषधामध्येही वापर केला जातो. गुळापासून गुळ पावडर, काकवी असे उपपदार्थ तयार केले जातात.

**कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या प्रयत्नामूळे व पाठपुराव्यामूळे कोल्हापूरी गुळास भौगोलिक उपदर्शन ( G.I. )मिळाला आहे.** त्या अनुषंगाने **कोल्हापूरी ब्रॅन्ड च्या गूळ उत्पादन पध्दती आणि विक्री व्यवस्था याबाबत गूळ उत्पादक शेतकरी, गु–हाळघरमालक, गुळवे, व्यापारी यांची व्यापक कार्यशाळा बुधवार दिनांक– ११–१२–२०१३ इ.रोजी दुपारी एक ( १ ) वाजता श्री शाहू सांस्कृतिक मंदीर, श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर येथे आयोजित केलेली आहे.** यावेळी ब्रॅन्डीगसाठी आवश्यक असणारी दर्जेदार व टिकाऊ गूळ उत्पादनाची पध्दत, कार्यप्रणाली तसेच उत्पादनानंतरची पॅकीग, साठवणूक, विक्री व्यवस्था इ. बाबत विविध तज्ञांकडून सविस्तर माहिती देणेत येणार आहे.

तरी सर्व गूळ उत्पादक शेतकरी, गु–हाळघरमालक, गुळवे, व्यापारी यांनी कार्यशाळेस उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा.

( डॉ. महेश कदम )<br>
प्रशासक,<br>
कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती,<br>
कोल्हापूर